**नियमीत दिवाणी मुकदमा नंबर ७६/२०१६ मधील निशाणी ५ खालील आदेश.**

**श्री. कचरु सावळीराम मंडलीक व इतर.**
**विरुध्द**
**श्री. रामदास लहानू मंडलीक व इतर.**

१. दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चा आदेश ३९ नियम १ अंतर्गत वादींच्या मिळकतीत प्रतिवादीं व त्यांच्यावतीने इतर कोणीही अतिक्रमण करुन, मेहनत मशागतीस हरकत-अडथळे करु नये, यासाठी तुर्तातुर्त ताकीदीचा हुकूम मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. दोन्ही बाजुंच्या विधीज्ञांचा सविस्तर युक्तिवाद ऐकला. अभिलेखावरील अर्ज, त्यावरील म्हणणे व दाव्यात दाखल केलेली सर्व कागदपत्रे विचारात घेता, या अर्जाचे अंतिम निर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित झाले. ते मुद्दे व त्यांचे निष्कर्ष कारण मिमांसेसह या खाली नमूद केलेले आहेत.

| अ. क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| **०१.** | वादींचा अर्ज सकृतदर्शनी आहे काय ? | ...नकारार्थी. |
| **०२.** | अर्जदार मागणी करतात त्याप्रमाणे तुर्तातुर्त मनाई हुकूमाचा आदेश मिळण्यास पात्र आहेत काय ? | ...नकारार्थी. |
| **०३.** | तात्पुरत्या मनाई हुकूमाचा आदेश पारीत न केल्यास वादींचे अपरीमीत असे नुकसान संभवते काय ? | ...नकारार्थी. |
| **०४.** | आदेश काय ? | ...अंतीम आदेशाप्रमाणे. |

**:: का र ण मि मां सा ::**
**मुद्दा क्र. १ ते ४ बाबत**

३. मुद्दा क्रमांक १ ते ३ हे एकमेकांशी निगडीत असल्याने पुनरावृत्ती टाळण्यासाठी त्यांची कारणमीमांसा खालीलप्रमाणे एकत्रीत केलेली आहे. तात्पुरत्या मनाई हुकूमाचा आदेश पारीत करण्यापुर्वी मुख्य म्हणजे, केलेला अर्ज प्रथमदर्शी आहे काय, अर्जदार तुर्तातुर्त मनाई हुकूमाचा आदेश मिळण्यास पात्र आहेत काय व अर्ज नामंजुर केल्यास कोणाचे अपरीमीत असे नुकसान संभवते, या तीन बाबींचा प्रामुख्याने विचार करणे आवश्यक असते.

४. दाव्याची पार्श्वभुमी थोडक्यात अशी की, दावा मिळकत मौजे पिंपळगाव (धा) ता. चांदवड, जि. नाशिक येथील गट क्र.२१३ चे क्षेत्रफळ ०२ हे ८५ आरच्या पुर्वेस गट क्र. २१४, २१५ व २१६, पश्चिमेस- ग.नं.२१२, दक्षिणेस गट क्र.२०८ व २१० व उत्तरेस- पिंपळगाव (धा), ही वादींच्या वडीलोपार्जित मालकीची व कब्जेवहीवाटीची आहे. त्या मिळकतीच्या पश्चिमेस प्रतिवादी नं. १ ची गट नं. २१२ असून, सन २०१२ मध्ये त्याने त्याच्या गटाची बांध बंदीस्त करतेवेळी दावा मिळकतींच्या दरम्यान असलेला उत्तर-दक्षिण बांध फोडून नुकसान केले. त्यावरुन वादींनी त्यांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी प्रतिवादींनी जमीन मोजणीचा सल्ला दिला व प्रतिवादी क्र. १ याने गट नं २१२ ची मोजणी

खात्याकडून मो. र. नं. १७९३/१२ द्वारे करुन घेतली. त्यावेळी प्रतिवादींच्या गट नं २१२ मधील ११ आर क्षेत्र हे वादींच्या गट नं. २१३ मध्ये दाखवले. त्यावरुन उपविभागीय अधिकारी, चांदवड यांच्याकडे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १३८ नुसार अतिक्रमित क्षेत्राचा ताबा मिळणेसाठी अतिक्रमण केस नं १७८/२०१३ दाखल केला. परंतु, वादीं उपविभागीय अधिकारी यांच्या न्यायलायात हजर राहिले नाहीत व परीणाम स्वरुप त्यांच्या विरुध्द एकतर्फा आदेश पारित झाला. त्या आदेशाच्या आधारे प्रतीवादीने त्यांच्या क्षेत्रात दि. २४/०२/२०१६ रोजी कब्जा केलेला आहे. त्यानंतर वादींना, प्रतिवादीं व लगत कब्जेदार यांनी गट नं. २१३ ची मोजणी करण्यासाठी लेखी संमती न दिल्याने, मोजणी खात्याकडून मोजणी करण्यास अडचणी निर्माण झाल्या. सबब, मो. र. नं १७९३/१२ मधील नकाशात व उपविभागीय चांदवड यांच्याकडील अतिक्रमित केस. नं. १७८/१३ मधील एकतर्फा निर्णयाच्या आधारे कब्जा करु नये, अशा निरंतरच्या ताकीदीसाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

५. प्रतिवादी क्र. १ ने **नि.क्र.१६** लगत दाव्यास **कैफीयत** व अर्जास जबाब दाखल केलेला आहे. त्यात त्याने अर्जातील सर्व मजकूर नाकारुन, वादींच्या मालकी व वहीवाटीबाबत आक्षेप न नोंदविता असा बचाव घेतला की, तो नोकरी निमित्ताने बाहेर गावी असल्याचा गैरफायदा घेवून, वादींनी त्याच्या मालकी हक्काच्या क्षेत्रात अतिक्रमण केले, ही बाब त्याच्या लक्षात आल्यानंतर त्याने त्याचे गट नं २१२ ची मोजणी करुन घेतली. त्या मोजणीत त्याच्या क्षेत्रातील ११ आर क्षेत्र वादींनी अतिक्रमण केल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे त्याने उपअधिक्षक, भूमि अभिलेख यांच्याकडे दि. ०७/०३/२०१२ रोजी त्याच्या मिळकतीच्या हद्दी निशाण्या कायम करुन देण्याबाबत अर्ज दिल्यावरुन, दि. १०/०४/२०१२ रोजी वादीचा मुलगा, लगत कब्जेदार व पंचांसमक्ष हद्दी निशाण्या कायम करण्यात आल्या. मोजणी झाल्यानंतर त्याने वादींना वेळोवेळी अतिक्रमण काढून घेण्याबाबत सांगितले. परंतु, वादींनी ऐकले नाही. सबब, त्याने अतिक्रमण क्षेत्राचा कब्जा मिळण्याकामी उपविभागीय अधिकारी, चांदवड यांच्याकडे दि. २०/११/२०१३ रोजी अर्ज केला, वादीं यांनी दाखल केलेले प्रकरणास आर.टी.एस./अतिक्रमण/१७८/२०१३ असा देण्यात आला. त्यानुसार वादींना नोटीसा देखील मिळाल्या, ते त्यांच्या वकीलांसह हजरही झाले. मात्र, अंतिम चौकशीच्या वेळी वादींनी त्यांची बाजू न मांडल्याने, दि. ३१/०७/२०१५ रोजी अंतिम एकतर्फा आदेश पारित झाला. त्यात निमताना मोजणीच्या व अपीलाच्या आधीन राहुन दोन महीण्यांच्या आत अतीक्रमीत क्षेत्राचा कब्जा देण्याबाबत आदेश पारीत केला. परंतु, वादींनी त्याबाबत आजतागायत काहीही कार्यवाही केलेली नाही. सबब, नियमानुसार त्यास दिनांक २४.०२.२०१६ रोजी अतीक्रमीत क्षेत्राचा कब्जा दिलेला आहे.

६. वादींनी त्यांच्या कथनांच्या पुष्ठ्र्थ फक्त वाद मिळकत गट नं. २१३ चा ७/१२ उतारा व अतिक्रमित केस नं १७८/१३ च्या निकालाची प्रमाणित प्रत दाखल केलेली आहे. तसेच, प्रतिवादींनी देखील त्यांच्या जबाबांच्या पुष्ठ्र्थ गट नं २१२ चा ७/१२ उतारा व त्याच गटाची मोजणी केल्याबाबतचा

मो.र.नं १७९३/१२ चा मोजणी नकाशा, आर.टी.एस./अतिक्रमण/ १७८/१३ च्या आदेशासह कब्जाबाबतच्या नोटीसची प्रत याकामी दाखल केलेली आहे. त्यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता, मौजे पिंपळगाव (धा) येथील गट नं २१२ व २१३ च्या ७/१२ उता-यावरुन वादीं व प्रतिवादींच्या मालकी व कब्जवेहीवाटीबाबत वाद दिसून येत नाही. परंतु, प्रतिवादीं क्र. १ याने त्याच्या गट नं. २१२ ची मोजणी दि.१०.०४.२०१२ रोजी केल्याचे व त्या मोजणीत जे अतिक्रमित क्षेत्र दाखविलेले होते, त्या अतिक्रमित क्षेत्राचा खुला कब्जा मिळण्यासाठी प्रतिवादी क्र. १ याने दाखल केलेल्या आर.टी.एस. /अतिक्रमण/ १७८/१३ मधील आदेशानुसार प्रतिवादी क्र. १ यास अतिक्रमित क्षेत्राचा कब्जा दिल्याचे दिसून येते. परंतु, वादींनी उपविभागीय अधिकारी, चांदवड यांच्याकडील आदेशाविरुध्द, आदेशात नमूद केल्याप्रमाणे निमताना मोजणी किंवा वरिष्ठ न्यायालयात अपिल दाखल करुन, दाद मागितलेली नाही. त्या आदेशाच्या विरुध्द वरिष्ठ न्यायालयात दाद न मागता, वादींनी प्रस्तुतचा मूळ दावा या अर्जासह दाखल केलेला आहे. सबब, आज मितीला तरी वादींचा अर्ज प्रथमदर्शी असल्याचे किंवा तुर्तातुर्त मनाई हुकूमाचा आदेश पारीत न केल्यास त्यांचे अपरीमीत नुकसान संभवत असल्याचे निष्कर्षाप्रत येणे संयुक्तिक वाटत नसल्याने, **मुदद्या क्र.१ ते ३** चा निष्कर्ष मी **उपरोक्तप्रमाणे** नोंदवत आहे.

**मुद्दा क्र.४ बाबतः-**

७. अभिलेखावरील दाखल कागदपत्रे, मूळ दावा, अर्ज व त्यावरील म्हणणे विचारात घेता, असे दिसून येते की, वादींनी त्यांच्याविरुध्द पारित झालेल्या उपविभागीय अधिकारी, चांदवड यांच्या आर. टी.एस./अतिक्रमण/१७८/१३ मधील आदेशानुसार जो अतिक्रमित क्षेत्राचा कब्जा प्रतिवादी क्र. १ यास दिलेला आहे. त्या आदेशाविरुध्द प्रस्तुतचा मुळ दावा या अर्जासह दाखल केलेला आहे. तरी देखील वादींनी दाखल केलेल्या दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २६ नियम ९ अंतर्गतच्या अर्जावरुन, वादीं व प्रतिवादींच्या गटांची संयुक्तिक मोजणीचे आदेश पारित केलेले असल्याने, त्याचा अहवाल प्राप्त होईपर्यंत व प्रकरणातील साक्षीपुरावा विचारात घेतल्याशिवाय, वादींच्या तोंडी व मोघम आरोपांवरुन त्यांचा अर्ज प्रथमदर्शी असल्याचे किंवा तुर्तातुर्त मनाई हुकूमाचा आदेश मिळण्यास ते पात्र असल्याचे म्हणता येणार नाही. सबब, खालील आदेश योग्य व न्यायोचित वाटतो.

**:: आ दे श ::**

१. अर्ज नामंजुर करण्यात येत आहे.

२. खर्चाबाबत आदेश अंतिम निकालाचे वेळी केला जाईल.

सही/-

(श.सं.धपाटे)

दिनांकः १०/०७/२०१७. सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,चांदवड.